**<u>नि.फौ.ख.क्र.४२१/२०२२</u>**

<u>निशाणी क्र.१३</u>

# <u>दोषारोप</u>

मी, **एस. ए. विराणी,** प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे खालीलप्रमाणे तुमचेवर दोषारोप ठेवत आहेः–

१. **संतोष ज्ञानेश्वर सातपुते,**
वय – ५४ वर्षे, व्यवसाय – शेती.

२. **अनुपमा संतोष सातपुते,**
वय – ५० वर्षे, व्यवसाय – घरकाम.
सर्व राहणार – वरवंड, ता. दौंड, जि. पुणे.

पहिले असे की, तुम्ही संगनमत करुन दिनांक २८.०१.२०२२ रोजी ६.०० वाजेच्या सुमारास मौजे वरवंड, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत शेतजमीन गट नं. १८७३ चे उत्तरचे सामाईक बांधावर फिर्यादी नामे दत्तात्रय भाऊसाहेब दिवेकर हे त्यांचे शेतातील ऊसाचे पिकाला पाणी देत असताना तुम्ही आरोपी क्र. १ ट्रॅक्टर घेऊन येत असताना फिर्यादीने "हा बांध ओला आहे, या बांधावरुन ट्रॅक्टर घालू नको" असे समजावून सांगत असताना फिर्यादीस ट्रॅक्टरचा धक्का लागल्याने फिर्यादी हे शेतामध्ये खाली पडले. त्यावेळी आरोपी क्र. २ ही ट्रॅक्टरचे बाजूला उभी होती. त्यानंतर आरोपी क्र. १ ट्रॅक्टर बंद करुन खाली उतरुन फिर्यादीस हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच आरोपी क्र. २ ने ट्रॅक्टरवर असलेला कु–हाडीचे तुंब्याने फिर्यादी यांना पाठीवर व मांडीवर मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

दुसरे असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी संगनमत करुन फिर्यादीस हाताने व लाथाबुक्याने मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

तिसरे असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी संगनमत करुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले

आणि अशा प्रक्षोभणामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

शेवटी असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी संगनमत करुन फिर्यादी यांना दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

आणि तुम्हास याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे की, तुमच्या विरुध्द उपरोक्त दोषारोपांवर खटल्याची चौकशी होईल.

**(एस.ए.विराणी)**
दिनांक – १०.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

**<u>दाखला</u>**

प्रमाणित करण्यात येते की, वरील दोषारोपांमधील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतून वाचून व समजावून सांगितला.

**(एस.ए.विराणी)**
दिनांक – १०.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.